जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८७ दिनांक - ०३/०२/२०२५**

लोणी काळभोर पोलीस ठाणे,पुणे शहर

## हुंडाबळीच्या गुन्ह्यातील आरोपीस सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

सदर घटना ही गंगानगर,मौजे फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे येथे आरोपीचे राहते घरी दिनांक ११/१२/२०१० नंतर ३ महिन्यांपासून ते दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या दरम्यान घडली आहे. यातील मयत सौ. अंजना नवनाथ ताकमोगे, वय २० वर्षे, ही सासरी नांदत असताना आरोपी १) नवनाथ पांडुरंग ताकमोगे (पती),वय ४४ वर्षे रा. सर्व्हे नं. २१५/५अ/२, गंगानगर, मौजे फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे २) दिनेश पांडुरंग ताकमोगे (दिर), ३)पाडुंरंग भानुदास ताकमोगे, (सासरे),वय ६९ रा.सदर ४) रुक्मीणी पांडुरंग ताकमोगे (सासू) वय ६४ रा.सदर ५) मेघा उर्फ सोनल पाडुंरंग ताकमोगे (नणंद) यांनी लग्नात व्यवस्थीत मानपान दिला नाही,फ्लॅटकरीता आई वडिलांकडून ३ लाख रुपये आणले नाहीत, म्हणून वारंवार टोचून बोलून मारहाण करुन घराबाहेर काढून तिचा हुंड्यासाठी मानसिक व शारिरीक छळ करुन तिला जीवन जगणे असहाय केले. त्यामुळे यातील मयत सौ. अंजना नवनाथ ताकमोगे हिने राहते घरी सततच्या होणाया छळाला कंटाळून अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेऊन मयत झाल्याने **लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक ११९/२०१२ भा.दं.वि.कलम ४९८(अ), ३०४(ब), ३०६, ३२३, ३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक नारायण पवार,यांनी केला व यातील आरोपींविरुद्ध मा.न्यायालयामध्ये मुदतीत दोषारोपपत्र सादर केले. सदर केसचा सेशन केस क्र.१८६/२०१३ असा आहे. शिक्षावरील प्रकरणामध्ये सबळ साक्षीपुराव्याअंती मा.जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी दिनांक ०३/०२/२०२५ रोजी आरोपी **१) नवनाथ पांडुरंग ताकमोगे वय ४४ वर्षे रा.सर्व्हे नं. २१५/५अ/२, गंगानगर, मौजे फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे** यास ७ वर्षे सश्रम कारावास व १५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना पंधरा दिवस साधा कारावास व आरोपी **२) पांडुरंग भानुदास ताकमोगे वय ६९ रा.सदर ३) रुक्मीणी पांडुरंग ताकमोगे वय ६४ रा.सदर** यांना ३ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास पंधरा दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरची कामगिरी सरकारी पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.प्रदिप गेहलोत, कोर्ट पैरवी श्रीमती ललिता कानवडे, यांनी कामकाज पाहिले. सदर कामगिरीकरीता प्रोत्साहन म्हणून मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर डॉ.राजकुमार शिंदे यांनी कोर्ट पैरवी पोलीस अंमलदार ललिता कानवडे व नमूद गुन्हयाचे तपासी अधिकारी सहा.पो.निरीक्षक नारायण पवार यांना ५ हजार रुपये बक्षिस मंजूर केले आहे.